<u>दिनांक – ३० नोव्हेंबर, २०२१.</u>

<u>वादी क्रमांक २ चा उलटतपास प्रतिवादीतर्फे वकील श्री.एम.एल. टावरी यांच्यामार्फत शपथेवर सुरु.</u>

०७. आम्ही चार भाऊ व तिन बहिणी आहोत. शपथपत्रातील परिच्छेद क्र. १ – ब मधे नमुद जमीन माझ्या वडिलांच्या मालकीची होती. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडिल दिनांक २१/१०/१९९७ रोजी मयत झाले असुन आज देखील सदर जमीनीचा उतारा त्यांच्या नावाचा निघतो. गट क्रमांक ३३१, ३३२ व ३३६ जुना सव्हे क्रमांक ११४ पासुन तयार झाला पासुन तयार झाल्याबाबत माला सांगता येणार नाही. मी गट एकत्रीकरण योजनेचे कागदपत्र पाहिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, जुना सव्हे क्रमांक ११४/२ माझ्या वडिलांच्या मालकीचा होता. हे म्हणणे खरे आहे की, त्यातील सव्हे क्रमांक ११४/२ – अ शालीग्राम सिताराम वाकोडे यांच्या मालकीचा होता. त्यापैकी सव्हे क्रमांक ११४/३ मरी सम्भुला वाकोडे हिच्या मालकीचा असल्याबाबत माला माहित नाही. सव्हे क्र. ११४/३ प्रतिवादीने विकत घेतल्याबाबत माला माहित नाही. तिच जमीन गट क्र. ३३६ झाल्याबाबत माला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, ति जमीन कमलाबाई वहित करित आहे.

०८. मी दावा मिळकती व्यतिरीक्त इतर जमीनींचे कागदपत्र पाहिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीच्या दक्षिणेला पिंपळखुटा धांडे ते माळेगांव असा पक्का रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या शेताच्या पुर्वेस दादाराव वाकोडे यांची जमीन आहे. हे म्हणणे खरे आहे की, दादारावच्या पुर्वेस प्रतिवादीच्या मालकीची गट क्र. ३३६ ही जमीन आहे. त्या जमीनीवर सन १९९१ साला पासुन प्रतिवादीची वहिती असल्याबाबत माला माहित नाही. त्याच वर्षी प्रतिवादीने सोनाजी पंढरी वाढे यांच्याकडुन गट क्र. १३६ मधील जमीन खरेदी केल्याबाबत माला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही

की, गट क्र. ३३६ मध्ये जाण्याकरिता आमच्या जमीनीच्या दक्षिणेकडील धु–याच्या आतील बाजुस व गट क्र. ३३२ च्या दक्षिण धु–याच्या आतुन रस्ता असुन, प्रतिवादीस सदरचा रस्ता मागिल विस वर्षापेक्षा जास्त काळाकरिता वापर करित आहे. हे म्हणणे खरे नाही की, दादाराव देखील त्याच रस्त्याचा वापर करतो. हे म्हणणे खरे नाही की, सव्हे क्र. ११४ च्या धारकांना सदरचा रस्ता कायम मोकळा असतो.

०९. हे म्हणणे खरे आहे की, सदर रस्त्याच्या दक्षिणेकडुन पुर्व – पश्चिम नाली वाहते. ति नाली पुढे गट क्र. ३३६ पर्यंत जात असल्याचे माला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदरची नाली बंडींगची असुन ति सरकारी नाली आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर नालीने पावसाचे पाणी वाहुन ते सरकारी रस्त्याने जाते.

१०. हे म्हणणे खरे आहे की, अशोक धांडे यांच्या नावाने माळेगांव शिवारात गट क्र. ३२४ ही जमीन असुन ति पिंपळखुटा धांडे या सरकारी रस्त्याला लागुन आहे. सदर जमीनीच्या पुर्वेस गट क्र. ३३७ असल्याचे माला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. ३३७ च्या उत्तरेस माझी जमीन आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. ३२४ व ३३१ एकमेकांना लागुन नाहीत. गट क्र. ३३७ ही मिळकत चांभार यांची आहे. मी कथन केलेल्या प्रतिवादींच्या रस्त्याबाबत मी गट क्र. ३३७ च्या मालकासोबत चर्चा केलेली नाही. मी गट क्र. ३३७ कधीही गेलेलो नाही. मी त्या मिळकतीच्या मालकांची साक्ष दाव्यात नोंदविणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी गट क्र. ३२४, ३३७ व ३३६ मधील रस्त्याचा वापर करित असल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझी, प्रतिवादींची व दादाराव वाकोडे यांची जमीन एकाच सव्हे मिळकतीतील असल्याने प्रतिवादींना माझ्या धु–याच्या आतुन रस्ता वापरण्याचा अधिकार आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शेताला कुंपण असल्याबाबत मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी जबरदस्तीने माझ्या शेतातुन रस्ता करित असल्याचे मी

खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी दाव्याचे कारण खोटे नमुद केले आहे.

११. माझ्या जिरायत जमीन आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १५/०६/२०१७ रोजी प्रतिवादीने माझ्या शेताचे कुंपण तोडण्याचे प्रयत्न केले, असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १०/०६/२०१७ रोजी माझ्या शेतात पेरणी झालेली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शपथपत्रातील संपुर्ण मजुर खोटा आहे.

फेरतपास नाही.

समक्ष,

सही/-

नांदुरा
दिनांक – ३०/११/२०२१.

**(म.बा. असीजा)**
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
नांदुरा.

– – – – –